# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
## पिंपरी ४११ ०१८
## प्रशासन विभाग

# जाहिरात क्र.१०६३/२०२१ चे अनुषंगाने निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवरील गट "ब" ते "ड" मधील पदे फक्त ६ महिने कालावधीकरीता दरमहा एकत्रित मानधनावर भरण्याकरीता जाहिरात क्र.१०६३/२०२१ दि.०२/०९/२०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत आले होते. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे त्यांना (शैक्षणिक पात्रता व अनुभव) गुण दिले होते व गुण दिल्यानंतर एकत्रित पदनिहाय गुणांची यादी महापालिकेच्या संकेत स्थळावर दि.०२/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करून उमेदवारांच्या हरकती व सुचना मागविल्या होत्या. त्यानुसार प्राप्त हरकती व सुचनांची तपासणी केल्यानंतर वैध हरकती मान्य केलेल्या आहेत व अवैध हरकतींचा विचार करणेत आलेला नाही. 'कनिष्ठ अभियंता' स्थापत्य पदाकरिता अलहिदा स्वतंत्र निवेदन प्रसिध्द करणेत येईल.

वैध हरकतींचा विचार केल्यानंतर महापालिकेने दिलेल्या जाहिराती मधील प्रत्येक पदाकरीता गुणानुक्रमे एका पदाकरिता ३ उमेदवार (१:३) या प्रमाणात उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभवाची मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये नमूद केलेले दिनांकास व वेळेत ॲटोक्लस्टर, मुंबई-पुणे हाईवेलगत, चिंचवड स्टेशन, पुणे - १९ या ठिकाणी समक्ष उपस्थित रहावे. अशा वेळी जर शेवटच्या उमेदवारास समान गुण प्राप्त झालेले असतील तेव्हा समान गुण असणाऱ्या सर्व उमेदवारांना मूळ कागदपत्रे तपासणीसाठी समक्ष बोलविण्यात येत आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीसाठी येताना सोबतच्या प्रपत्र "अ" येथे नमूद केलेप्रमाणे त्यांची मूळ कागदपत्रे व त्यांची एक झेरॉक्स सत्य प्रत सोबत घेवून येणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने नेमून दिलेल्या दिवशी व वेळेत उमेदवार उपस्थित न राहिल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/२४/कावि/१३४/२०२१
दिनांक - ११ /१०/२०२१

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## प्रशासन विभाग
## प्रपत्र "अ"
## कागदपत्रे तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | बाब | सोबत आणावयाची कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अर्ज | ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रत | सर्व पदांसाठी |
| २ | वय | सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र/ वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-यांने दिलेले प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| ३ | शैक्षणिक अर्हता | एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र | सर्व पदांसाठी |
| | | एच.एस.सी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| | | अर्जात नमूद केले प्रमाणे किमान अर्हता व अतिरिक्त शैक्षणीक अर्हता गुणपत्रक व प्रमाणपत्र. | |
| | | ज्या उमेदवारांनी अर्जात CGPA/ SGPA/ Grade नमूद केले आहे त्या उमेदवारांनी महाविद्यालय/ युनिव्हर्सिटी टक्केवारी (उदा.६५.४८%) नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. | |
| ४ | संगणक अर्हता | शासन मान्य संस्थेकडील संगणक अर्हता धारण केलेले प्रमाणपत्र (माळी पद वगळता सर्व पदासाठी) | |
| ५ | जाती प्रमाणपत्र | मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी सक्षम प्राधिका-याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी |
| ६ | अनुभव दाखला (संबंधित पदाचे काम केल्याचे) | शासकीय/ निमशासकीय संस्थेमध्ये काम केलेबाबतची अनुभव प्रमाणपत्र. | सर्व पदांसाठी (उद्यान अधिकारी पद वगळून) |
| | | शासकीय/ निमशासकीय/ खाजगी संस्थेमध्ये काम केलेबाबतची अनुभव प्रमाणपत्र. | उद्यान अधिकारी |
| ७ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावांत बदल केल्याबाबत राजपत्राची प्रत | विवाहित स्त्री उमेदवारांनी विवाह निबंधक यांनी दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ दाखला किंवा नावांत बदल केलेबाबतचे अधिसूचीत राजपत्र. | सर्व पदांसाठी |

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## प्रशासन विभाग
## प्रपत्र "ब"

| अ.क्र. | पदाचे नांव व भरावयाची पदसंख्या | | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १) | पशु वैद्यकीय अधिकारी | (४) | १४/१०/२०२१ | स.१०.०० ते दु.१२.०० |
| २) | उद्यान अधिकारी | (८) | | |
| ३) | सहा.उद्यान अधिकारी | (८) | | |
| ४) | आरोग्य सहाय्यक | (१६) | | |

| अ.क्र. | पदाचे नांव व भरावयाची पदसंख्या | | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| ५) | सुपरवायझर | (२०) | १४/१०/२०२१ | दु.१२.०० ते दु.२.०० |
| ६) | परवाना निरिक्षक | (४) | | |
| ७) | निरिक्षक | (१६) | | |
| ८) | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | (४) | | |
| ९) | ॲनिमल किपर | (४) | | |

| अ.क्र. | पदाचे नांव व भरावयाची पदसंख्या | | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १०) | माळी | (५२) | १६/१०/२०२१ | स.१०.०० ते दु.१२.०० |

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018
एकत्रीत मानधनावरील भरती - परिशिष्ठ -

पदनाम - ॲनिमल किपर

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | उमेदवाराचे नाव | एकूण गुण | जात प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| | | खुला | | |
| 1 | 1553 | Pawar Abhijit Netaji | 75 | खुला |
| | | अनुसूचित जाती | | |
| 1 | 6487 | Kamble Rajesh Madhukar | 75 | अनुसूचित जाती |

खुल्या प्रवर्गाचे गुणानुक्रम यादीमध्ये जे मागासप्रवर्गातील उमेदवार गुणानुक्रमे पात्र ठरलेले आहेत. अशा उमेदवारांचा खुल्या प्रवर्गातील सर्व पदे भरल्यानंतर त्या त्या आरक्षण निहाय प्रवर्गातून गुणानुक्रमे विचार करण्यात येईल.

टिप - 1) उमेदवारांनी विहीत वेळेत दिलेल्या हरकती / सुचनांचा एकूण गुण देताना विचार करण्यात आलेला आहे. त्यापैकी ज्या हरकती वैध आहेत त्याच हरकती / सुचनांचा (पदवी / पदव्युत्तर शिक्षण व अनुभव) एकूण गुण देताना विचार केलेला आहे. ज्या हरकती / सुचना वैध नाहीत त्यांचा विचार करण्यात आलेला नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411018